**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:केंमाअ-२००५/प्र.क्र.३५७/आस्था.
सार्वजनिक आरोग्य विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २७ सप्टेंबर, २००५

संदर्भ:-१) शासन आदेश, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक- ममाअ २००४/ प्र.क्र.१७/आ-२, दिनांक २६ मार्च, २००४.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-केंमाअ/२००५/ प्र.क्र.१९०/०५/५, दिनांक १८ जून, २००५.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-केंमाअ/२००५/ प्र.क्र.१९०/०५/५, दिनांक ६ ऑगस्ट, २००५.
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-केंमाअ/२००५/ प्र.क्र.२३०/०५/५, दिनांक १८ ऑगस्ट, २००५
५) शासन आदेश क्रमांक केंमाअ २००५/प्रक्र ३५७/आस्था, दिनांक २६ सप्टेंबर २००५.

## <u>कार्यालयीन आदेश</u>

संदर्भ क्रमांक ५ चे कार्यालयीन आदेश कृपया रद्द समजावेत त्याऐवजी हा सुधारित आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

माहितीच्या अधिकारासंदर्भातील केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ केंद्र शासनाच्या दिनांक २१ जून, २००५ च्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. या संदर्भात केंद्र शासनाच्या दिनांक २६ मे, २००५ च्या पत्रात नमूद केलेल्या मुद्यांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना संदर्भाधीन क्रमांक २ च्या दिनांक १८ जून, २००५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ राज्य शासनाच्या विधी व न्याय विभागाकडून दिनांक २१ जुलै, २००५ च्या राज्य शासनाच्या राजपत्रात पुन्हा प्रसिध्द करण्यात आला असून सदर राजपत्राची प्रत संदर्भाधीन क्रमांक-३ च्या दिनांक ६ ऑगस्ट, २००५ च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना पाठविण्यात आली आहे.

२. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत "राज्य शासकीय सहायक माहिती अधिकारी" "राज्य शासकीय माहिती अधिकारी" आणि "अपिलीय प्राधिकारी" यांच्या नव्याने नियुक्त्या करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळे यापूर्वी महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ नुसार या विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक-१ येथील दि.२६ मार्च, २००४च्या

Gr kk

कार्यासनांतील आदेशान्वये सार्वजनिक आरोग्य विभाग (खुद्द) साठी नियुक्त करण्यात आलेल्या "शासकीय माहिती अधिकारी" आणि "अपिलीय प्राधिकारी" यांत बदल करून केंद्र शासनाच्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीनुसार सुधारित आदेश आता निर्गमित करण्यात येत आहेत.

३. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ५ (२) नुसार माहिती प्राप्त करून घेण्याकरिता या अधिनियमातील तरतुदींअंतर्गत नागरिकांकडून येणारे अर्ज/ अपिलीय अर्ज स्वीकारून ते संबंधित "राज्य शासकीय माहिती अधिकारी"/ "राज्य शासकीय अपिलीय प्राधिकारी" यांना आवश्यक कागदपत्रे/ माहितीसह उपलब्ध करून देण्याकरिता सोबतच्या **विवरणपत्रातील स्तंभ ३ मधील कक्ष अधिकाऱ्यांना** त्यांच्या नावांसमोर दर्शविण्यात आलेल्या कार्यासनामध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांकरिता **"राज्य शासकीय सहायक माहिती अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम, २००५ मधील कलम ५ (१) नुसार सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांबाबतची माहिती या अधिनियमातील तरतुदींअंतर्गत नागरिकांना उपलब्ध करून देण्याकरिता सोबतच्या **विवरणपत्रातील स्तंभ ४** नुसार विभागातील **अवर सचिव** यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविण्यात आलेल्या कार्यासनांमध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांकरिता **"राज्य शासकीय माहिती अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ नुसार नागरिकांकडून प्राप्त होणाऱ्या अपील अर्जावर कार्यवाही करण्याकरिता **विवरणपत्रातील स्तंभ ५ मधील उप सचिव** यांना त्यांच्या नावांसमोर दर्शविण्यात आलेल्या कार्यासनांमध्ये हाताळण्यात येणाऱ्या विषयांकरिता **"राज्य शासकीय अपिलीय प्राधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे.

६. उपरोक्त राज्य शासकीय सहाय्यक माहिती अधिकारी, राज्य शासकिय माहिती अधिकारी, व अपिलीय प्राधिकारी यांनी केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार, अधिनियम २००५ मधील कलमांचे काटेकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प.श. अहमद)**
**महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव**

**सहपत्र:** विवरणपत्र

प्रति,
राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
Gr 8i.

उप मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, मुंबई
महासंचालक, आरोग्य सेवा, मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा, (निविमु),मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा ( वैद्यकिय),मुंबई
सहसंचालक, आरोग्य सेवा, (हि. व ह. ) पुणे
सहसंचालक, आरोग्य सेवा (आरोग्य ),पुणे
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा, मंडळे
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई
प्रबंधक, लोक आयुक्त उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), मुंबई
सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), मुंबई
राज्य निवडणूक आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, मुंबई.
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
सामान्य प्रशासन विभाग, का.५ मंत्रालय, मुंबई
विभागातील सर्व अधिकारी /कार्यासने
विभागातील सर्व क्षेत्रीय कार्यालये
निवड नस्ती (आस्थापना)

## सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

## केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ५ (१) व १९ अनुसार राज्य शासनाचे माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची यादी

## विवरणपत्र - अ

| अ क्र | महत्वाचे विषय | माहिती अधिकारी | माहिती अधिका-याचा कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक | अपिलीय प्राधिकारी | अपिलीय प्राधिका-यांचा कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | १) खुद्द विभागातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सर्व सेवाविषयक बाबीं , नवीन पदे निर्माण करणे/ पदे पुढे चालू ठेवणे, वेतननिश्चिती, आश्वासीत प्रगती योजना, प्रशिक्षण विषयक बाबीं व त्यांना अनुज्ञेय असलेले सर्व प्रकारचे अग्रीम, भविष्यनिर्वाह निधीतून अग्रीम व ना-परतावा अग्रीमे, कार्यालयाच्या बैठक व्यवस्था.<br>२) खुद्द विभागाशी संबंधित आकस्मिक खर्चाची विलंबित देयके व लेखा कार्यालयाकडून आलेले निरीक्षण अहवाल. | कक्ष अधिकारी आस्थापना | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-.२२७९३७७० | सह /उप सचिव (आस्थापना) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र- २२०२०४७६ |
| २ | १) विधानमंडळ कामकाजाचे समन्वय.<br>२) लोकलेखा समिती , पंचायत राज समिती व विधीमंडळाच्या अन्य समित्यांच्या (अंदाज समिती व लोकलेखा समिती वगळून) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या विषयीच्या शिफारशीवर कारवाई.<br>३) सार्वजनिक आरोग्य विभागामधील प्रलंबित आश्वासने व त्यांचा निपटारा. | अवर सचिव समन्वय - १ | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र- २२८२३५०१ | सह /उप सचिव (रुग्णसेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र- २२,०२५,८३० |
| ३ | १) मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयाबाबत केलेल्या कार्यवाहीची एकत्रित माहिती पाठविणे.<br>२) विभागातील समन्वय व संकिर्ण बाबी, इतर कार्यासनाशी संबंधीत नसलेले (सेवा विषयक बाबी वगळून ) विषय, राज्यपालांचे अभिभाषण, वि.का.क.शी संबंधीत प्रकरणांचा समन्वय.<br>३) मागासवर्गीय व अपंगाचे आरक्षण तसेच विभागाच्या नियंत्रणाखालील कार्यालयातील रिक्त पदे व भरलेल्या पदांसंदर्भातील माहिती अद्यावत ठेवणे व ती सामान्य प्रशासन विभागाला पाठविणे<br>४)विभागातील प्रलंबित प्रकरणांची माहिती अद्यावत ठेवून ती सामान्य प्रशासन विभागाला पाठविणे.<br>५) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ बाबतची अंमलबजावणी. | अवर सचिव- समन्वय-२ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला दालन क्र. ७२८ (विस्तार) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र- २२७९३८५३ | सह /उप सचिव (अर्थसंकल्प) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र- २२०४२८३८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | **<u>नागपूर, अकोला व नाशिक मंडळातील</u>**<br>१)जिल्हा सामान्य रुग्णालये, जिल्हा स्त्री रुग्णालये, मानसिक आरोग्य संस्था, शासकीय दवाखाने, आयुर्वेद दवाखाने, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, कुटीर रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंन्दे/उपकेंन्दे/फिरती रुग्णालये यांची स्थापना व त्यांच्या प्रशासकीय बाबी तसेच या आरोग्य संस्थांच्या अभ्यागत समित्या नियुक्त करणे व सदर समित्यांशी संबंधित बाबी.<br>२) मानसेवी व सहाय्यक मानसेवी वैद्यकीय अधिका-यांची पदे निर्माण करणे व नेमणूका.<br>३) मानसिक आरोग्य व अधिनियम व त्याबाबतच्या नियमाशी संबंधित सर्वसाधारण बाबी.<br>४) खाजगी रग्णालयांना जमिन उपलब्ध करुन देण्याचे प्रस्ताव व त्या अनुषंगाच्या सर्व बाबी.<br>५) शवविच्छेदन सुविधा निर्माण करणे, महामार्गावरील रुग्णालयीन व्यवस्थापन, ट्रामा केअर युनिट व किमान गरजा कार्यक्रम व त्यांची अंमलबजावणी.<br>६) नर्सिग स्कूल्स (अनुदानाच्या प्रकरणाखेरीज) मान्यता व प्रशासकीय बाबी.<br>७)नगरपालिकेच्या/महापालिकेच्या व जिल्हा परिषदांच्या रा.का.वि.यो. व अन्य आरोग्य संस्था शासनाच्या ताब्यात घेणे.<br>८)गडचिरोली/चंद्रपूर व इतर मागास भागासाठी शासनाने केलेला विशेष कृती कार्यक्रम.<br>९)सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर. | कक्ष अधिकारी - आरोग्य-३ | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३४०० | सह /उप सचिव (रुग्णसेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८३० |
| ५ | १) **<u>ठाणे, पुणे कोल्हापूर, औरंगाबाद व लातूर मंडळसाठी</u>** वरील अ.क्र.४ मधील बाब क्र १ ते ७ प्रमाणे .<br>२) उपसंचालक, राज्य आरोग्य सेवा परिवहन यांच्या कार्यालयाचे कामकाज व प्रशासकीय बाबी | कक्ष अधिकारी -आरोग्य-४ | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३४०० | सह /उप सचिव (रुग्णसेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८३० |
| ६ | १) राष्ट्रीय अंधत्व, क्षयरोग, हिवताप, हत्तीरोग, कुष्ठरोग, कर्करोग, एडस् , गलगंड, नारु, गुप्तरोग नियंत्रण कार्यक्रम इ. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम व त्याची अंमलबजावणी व प्रशासकीय बाबी.<br>२) मौखिक आरोग्य कार्यक्रम, नेत्रपेढया, क्षय/ उरो रुग्णालये. व सिस्टोसोमियासिस नियंत्रण<br>३) राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रम, व्यसनमुक्ती कार्यक्रम<br>४) कुष्ठरोग संस्थांना अनुदान.<br>५)इंडियन एपिडेमिक ॲक्ट व अंमलबजावणी, सर्व साथरोग तसेच अतिवृष्टीमुळे दुषित झालेल्या पाण्याने पसरलेले साथीचे आजार व त्यांचे नियंत्रण आणि उपाययोजना. | कक्ष अधिकारी - आरोग्य-५ | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-१३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३७७२ | सह /उप सचिव (अर्थसंकल्प) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०४२८३८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ६) नागरी संरक्षण व आपातकालीन व्यवस्थापन (डिझ्रास्टर मॅनेजमेन्ट)<br>७) खाजगी स्वंयसेवी संस्थाना अनुदान व त्यांचेशी संबंधीत सर्व प्रकरणे (कुटुंब कल्याण कार्यक्रमासाठी देण्यात येणारे अनुदान वगळून)<br>२२) वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती / महाराष्ट्र राज्य सेवा (वैद्यकीय देखाभाल)नियम १९६१ ची अंमलबजावणी व सुधारणा | | | | |
| ७ | १) रुग्णालय वगळून अशासकीय संस्थांची रुग्णालये इ. आरोग्य संस्थांना आयात प्रमाणपत्रे देणे, सीमाशुल्क करमाफीसाठी प्रमाणपत्रे देणे.<br>२) वैद्यकीय मंडळाची रचना व त्या अनुषंगाने इतर बाबीं.<br>३) संचालक, सहसंचालक (आरोग्य), सर्व उपसंचालक (मंडळे), आरोग्य सेवा, आरोग्य प्रयोगशाळा, उपसंचालक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या प्रशासकीय बाबी.<br>४) महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्प, रक्तपेढया व रक्तसंक्रमण सेवा व जीवनदायी आरोग्य योजना. | कक्ष अधिकारी - आरोग्य-६ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला दालन क्र. ७२८ (विस्तार) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३८५३ | सह /उप सचिव (अर्थसंकल्प) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०४२८३८ |
| ८ | १) संपूर्ण राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, अभियानासंदर्भात केंद्र शासनाशी समन्वय व कार्यक्रमाचा आढावा व मुल्यमापन.<br>२) अभियान संचालक व त्यांच्या कार्यालयाच्या प्रशासकीय व वित्तीय बाबी.<br>३) अभियानसंदर्भात समन्वय (आर.सी.एच.सोबत) | अवर सचिव- आरोग्य-७- | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सह /उप सचिव (कुटुंब कल्याण) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |
| ९ | १) आर.सी.एच.कार्यक्रमाच्या आराखडयाच्या सर्व घटकाची अंमलबजावणी, कार्यक्रमाच्या संदर्भात केंद्र शासनाशी समन्वय व कार्यक्रमाचा आढावा व मूल्यमापन | अवर सचिव- आरोग्य-७-ब | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सह /उप सचिव (कुटुंब कल्याण) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |
| १० | १)आरोग्य सेवा संचालनालयांतर्गत सर्व रुग्णालयांसाठी औषधे, यंत्रसामग्री व साधनसामग्री यांची खरेदी करण्यासंदर्भात धोरण निश्चित करणे, आरोग्य विभागासाठी स्वतंत्र दरकरार करणे व खरेदीच्या अनुषंगाने उद्भवणारी प्रकरणे. | अवर सचिव -आरोग्य-८ | सा.आ. विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०४५१५०० | सह /उपसचिव (कुटुंब कल्याण) | सा.आ.विभाग, १ ला मजला दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ११ | १)आईसी ब्यूरो व प्रसिध्दी विषयक कार्यक्रम.<br>२)विभागाचा (खुद्द) संगणक कक्ष व विभागातील कामाचे संगणकीकरण व त्याचे समन्वय विभागाची वेबसाईट अद्यावत ठेवणे संचालक, माहिती व तंत्रज्ञान यांचेशी समन्वय ठेवणे व वेळोवेळी प्रशिक्षण आयोजित करणे.<br>३) प्रशिक्षणासंबंधी प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर संचालकांचे अभिप्राय घेवून त्यास अ.मु.स. यांची मान्यता घेवून पुढील कार्यवाहीकरीता सेवा-२ कार्यासनाकडे पाठविणे.<br>४)मॅनेजमेन्ट ऑफ इन्फर्मेशन सिस्टीम (MIS). | कक्ष अधिकारी -आरोग्य-९ | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३४०० | सह /उप- सचिव (कुटुंब कल्याण) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |
| १२ | १)सामान्य राज्यसेवा गट-ब, वैद्यकीय अधिकारी गट-ब व दंतशल्य चिकित्सक संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी .<br>२)आकृती बंधानुसार वेतनश्रेणी रुपये ६५००-१०५०० अधिका-यांची कार्यक्रम प्रमुख निहाय जिल्हा निहाय मंजूर पदे, भरलेली पदे व रिक्त पदे याबाबतची संपूर्ण कार्यवाही.<br>३)रुपये ६५००-१०५०० वेतनश्रेणीत धारण करणा-या अधिका-यांच्या वेतनश्रेणीत आवश्यकती वाढ / सुधारणा करणे. | अवर सचिव- सेवा-१ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला दालन क्र. ७२८ (विस्तार) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३८५३ | सह /उप- सचिव (सेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| १३ | १)आरोग्य सेवेतील गट अ संवर्गातील सर्व अधिका-यांच्या (वैद्यकीय अधिकारी वगळून) सेवा विषयक सर्व बाबी. गट-अ मध्ये पदोन्नती तसेच यासाठी निवडसूची तयार करणे.<br>२)गट-अ च्याअधिका-यांना मिडा, फेलोशिप, सेमिनार, प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रतिनियुक्तीवर पाठविणे.<br>३)गट-अ संवर्गातील अधिकाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम.<br>४)गट-अ च्या अधिकारी संघटनेकडून प्राप्त होणारी निवेदने. | अवर सचिव-सेवा-२ | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३७७१ | सह /उप- सचिव (सेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| १४ | १) आरोग्य सेवा संचालनायातील महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट अ संवर्गातील वैद्यकीय अधिका-यांच्या सेवा विषयक सर्व बाबी, वै.अ.गट-अ मध्ये पदोन्नती देणे तसेच यासाठी निवडसूची तयार करणे, पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी वैद्यकीय अधिकाऱ्याची निवड तसेच अवघड प्राथमिक आरोग्य केंद्र घोषित करणे.<br>२) म.वै.आ.से.गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी पदाचे सेवाप्रवेश नियम.<br>३) वैद्यकीय अधिकारी गट-अ च्या संघटनेकडून प्राप्त होणारी निवेदने. | अवर सचिव-सेवा-३ | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३७७० | सह /उप- सचिव (सेवा) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| १५ | आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट अ व ब संवर्गातील अधिकाऱ्यांबाबतच्या तक्रारी / विभागीय चौकशी / फौजदारी कार्यवाही / ए.सी.बी. प्रकरणे तसेच विभागीय चौकशी व फौजदारी कार्यवाहीच्या संदर्भातील न्यायालयीन बाबी. (एन ते झेड अद्याक्षरे असलेल्या अधिका-यांची प्रकरणे.) | अवर सचिव-सेवा-४ | सा.आ.विभाग,दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३००४ | सह /उप सचिव (आस्थापना) | सा.आ.विभागदालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १६ | अ.क्र. १५ प्रमाणे ए ते एच अद्याक्षरे (आडनांवाप्रमाणे) असलेल्या अधिका-यांची प्रकरणे. | अवर सचिव सेवा-४-अ | सा.आ.विभाग दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३००४ | सह /उप सचिव (सेवा) | सा.आ.विभाग दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| १७ | १) अ.क्र. १६ प्रमाणे आय ते एम अद्याक्षरे (आडनांवाप्रमाणे) असलेल्या अधिका-यांची प्रकरणे.)<br>२) सेवा-३ कार्यासनामधील सर्व न्यायालयीन प्रकरणे.<br>३) सार्वजनिक आरोग्य विभागामधील सर्व न्यायालयीन प्रकरणासाठी नोडल ऑफीसर | अवर सचिव सेवा-४ - ब | सा.आ.विभागदालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०४५१५० | सह /उप सचिव (सेवा) | सा.आ.विभाग दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| १८ | १) आरोग्य सेवा संचालनालयाच्या गट-ब (अराजपत्रित) गट-क व गट-ड (वर्ग-३ वर्ग ४ संवर्गातील कर्मचा-यांच्या सर्व सेवाविषयक बाबी<br>२) आकृतीबंधानुसार गट-ब (अराजपत्रित) तसेच गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांची कार्यक्रम प्रमुख निहाय / जिल्हा निहाय मंजूर पदे / भरलेली पदे / रिक्त पदे याबाबतची संपूर्ण कार्यवाही<br>३) गट-ब (अराजपत्रित) तसेच गट-क व गट-ड मधील कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत आवश्यकती वाढ / सुधारणा करण्याबाबत तसेच इतर मागण्यांबाबतची सर्व प्रकरणे | अवर सचिव सेवा-५ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला दालन क्र. ७२८ (विस्तार) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३८५३ | सह /उप सचिव (राकावि) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२९०७० |
| १९ | १) युनिसेफ व युएनएफपीए सहाय्यित बॉर्डर डिस्ट्रीक्ट प्रकल्प<br>२) अर्बन आरसीएच/युएनएफपीए सहाय्यित वर्धा आरएच प्रोजेक्ट व जर्मन सहाय्यित बेसिक हेल्थ महाराष्ट्र प्रकल्प व युरोपियन कमिशन सहाय्यित सेक्टर इन्व्हेस्टमेंट कार्यक्रम.<br>३) Integrated Management of Neo-natal and Childhood Illness. (IMNCI)<br>४) पौगंडा(यौवन) (Adolsent) अवस्थेतील तरुणांना आरोग्य विषयक सेवा पुरविणे.<br>५) बालमृत्युबाबत उपाययोजना.<br>६) माता बाल संगोपन विषयक मेळघाट भागातील कुपोषण.<br>७) केंद्र पुरस्कृत जननी सुरक्षा योजना, सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना, आरोग्य विमा योजना, आरोग्य रक्षक योजना.<br>८) आरोग्य व कुटुंब कल्याण धोरणाशी संबंधित बाबी व कार्यक्रमाचे मूल्यमापन.<br>९) आदिवासी भागासाठी नवसंजीवनी योजनेंतर्गत मातृत्व अनुदान योजना व दाई बैठक योजना, पाडा स्वयंसेवक योजना.<br>१०) महिला आरोग्य मंडळे, लोकसंख्या धोरण, राज्य संकीर्ण निधी<br>११) पुरुष नसबंदी, स्त्री नसबंदी शस्त्रक्रिया व त्यामुळे होणारे गुंतागुंती व मृत्यूचे प्रकरण.<br>१२) कु.क.कार्यक्रमाखाली अस्थाई पदांना मुदतवाढ देणे. | अवर सचिव कु.क. - १ | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सह /उप सचिव (कुटुंब कल्याण) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |
| २० | १)पोलिओ निर्मूलन कार्यक्रम व त्यांचेशी संबंधित इतर कार्यक्रम/सार्वत्रिक लसटोचणी कार्यक्रम.<br>२)शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रम. | अवर सचिव- कु.क. -२ | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा | सह /उप | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | ३)प्रसवपूर्व गर्भनिदान तंत्र अधिनियम १९९४.<br>४)कुटुंब कल्याण कार्यक्रमाशी संबंधित सर्व प्रशासकीय बाबी, लेखा परिक्षण अहवाल व स्वयंसेवी संस्थांचे कर्मचारीवर्ग व अनुषंगिक बाबीं. कु.क. कार्यक्रमाखाली देण्यात येणारे अनुदान.<br>५) डॉ.आनंदीबाई जोशी पुरस्कार योजना.<br>६)जन्ममृत्यु नोंदणी कायद्याच्या अनुषंगाने उद्‌भवणाऱ्या बाबी.<br>७)महाराष्ट्र विवाह मंडळाचे विनियमन व विवाह नोंदणी कायदा तसेच भारतीय ख्रिश्चन विवाह कायदा १८७२.<br>८)जीवनविषयक आकडेवारी, ब्युरोच्या सर्व प्रशासकीय बाबीं.<br>९)संघटनात्मक सुविधा-प्रसूती पश्चात केंद्र, नागरी कुटुंब कल्याण केंद्रे, नागरी आरोग्य संस्था, निर्बिजीकरणासाठी राखीव खाटा.<br>१०) महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट व त्याची अंमलबजावणी व अनुषंगिक बाबी.<br>११)कुटुंब कल्याण कार्यक्रमाच्या इतर कार्यासनामध्ये समन्वयाच्या व संकीर्ण बाबी. | | दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सचिव (कुटुंब कल्याण) | दालन क्र. ११० (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२५८२८ |
| २१ | १)राज्य कामगार विमा योजनोतील गट अ, ब संवर्गातील अधिका-यांच्या तसेच गट क व ड संवर्गातील कर्मचा-यांच्ये सेवा प्रवेश नियम तयार करणे, नामनिर्देशनाने/पदोन्नतीने नियुक्ती, विभागीय चौकशी / शिस्तभंग विषयक कार्यवाही / एसीबी व न्यायालयीन प्रकरणे, ज्येष्ठता सूची, वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती इ. सेवा विषयक बाबी.<br>२)गट अ व ब संवर्गातील अधिसेविका/सहाय्यक अधिसेविका यांच्या सर्व सेवाविषयक बाबी.<br>३)परिचर्या सेवा विषयक प्रकरणे. | अवर सचिव, रा.का.वि.-१ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला (विस्तार), टेरेस मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३११४ | सह /उप सचिव (राकावि) | सा.आ.विभाग, दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२९०७० |
| २२ | १)राज्य कामगार विमा योजना संबंधीच्या धोरणात्मक व संकीर्ण बाबी, पदनिर्मिती, अस्थायी पदे पुढे चालू ठेवणे, यंत्रसामुग्री, वाहन खरेदी व पुरवठा/औषधे खरेदी प्रकरणे/औषधी खरेदी दरकरार<br>२)राज्य कामगार विमा योजना संचालनालयातील सर्व संबंधित समित्यांच्या अहवालाची छाननी करणे<br>३)महात्मा गांधी मेमोरियल हॉस्पिटलशी संबंधीत सर्व बाबी.<br>४)अधिकारी /कर्मचारी संघटनांना मान्यता देणे व त्यांच्या मागण्या.<br>५)विमा कामगारांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची प्रकरणे व कालबाहय दावे.<br>६)ग्राहक तक्रार मंच प्रकरणे, बांधकाम व दक्षता पथकाशी संबंधीत बाबी.<br>७)विस्तार सेवा दवाखाने/विशेषज्ञ केंद्रे/नवीन रुग्णालये सुरु करणे.<br>८)शासकीय निवासस्थान/घरभाडे/रुग्णालयाकरिता/सेवा दवाखान्याकरिता/भाडयाने घेतलेल्या जागाबाबतची प्रकरणे. | अवर सचिव, रा.का.वि.-२ | सार्वजनिक आरोग्य विभाग, ७ वा मजला (विस्तार), टेरेस मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३११४ | सह /उप सचिव (राकावि) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३७ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२९०७० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २३ | १)विभागाचा अर्थसंकल्प व अर्थसंकल्पीय तरतुदीचे वितरण, नियोजन, नवीन लेखाशिर्ष उघडणे.<br>२)विनियोजन लेखे तयार करणे व महालेखापालाकडील माहिती बरोबर ताळमेळ करणे.<br>३) अंदाज समिती, वित्त आयोग, वित्त मंत्र्यांचे अर्थसंकल्पावरील अभिभाषण, कार्यक्रम अंदाजपत्रक, वीस कलमी कार्यक्रम, जिल्हा परिषदांचे अनुदान निर्धारण, खर्चाचा ताळमेळ.<br>४)ट्रायबल सब प्लॅन (वर्ग बाबी), महसूल विषयक सर्व बाबी.<br>५)लेखा प्रारुप परिच्छेद व थकित लेखा परीक्षा अहवालाच्या निपटा-यासाठी स्थापन केलेल्या लोकलेखा समितीचे कामकाज. | कक्ष अधिकारी-(अर्थसंकल्प) | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सह /उप सचिव (अर्थसकंल्प) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०४२८३८ |
| २४ | १)विभागात येणारी सर्व पत्रे, संदर्भ स्विकारुन त्यांची नोंदणी करणे व संबंधित कार्यासन व अधिका-यांना देणे.<br>२)विभागातून बाहेर जाणा-या पत्रांची नोंद घेऊन ती निर्गमित करणे.<br>३)लेखन सामग्री/लेखे ठेवणे/पुरवठा करणे व साठा रजिस्टर अद्यावत करणे, फर्नीचरची तसेच यंत्रसामुग्रीची नोंद Dead Stock Register मध्ये घेणे व दुरुस्ती. निष्क्रीय वस्तूंची विल्हेवाट.<br>४)मुद्रांकाचा हिशोब, फ्रॅन्कींग मशीनमधील रकमेचा हिशोब ठेवणे व मशीनचे परिरक्षण इ.<br>५)वर्ग-४ कर्मचा-यांवर देखरेख नियंत्रण/ उपस्थिती.<br>६)अधिका-यांना अनुज्ञेय वस्तूंचा पुरवठा करणे, दूरध्वनी, स्टेशनरी, फर्निचर, झेरॉक्स, संगणक, रोनिओ मशीन व फॅक्स यंत्रे पुरवठा व त्याचे परिरक्षण.<br>७)खुद्द विभागातील अधिकाऱ्यांच्या व कार्यालयाच्या वापरात असलेली वाहने व त्यांचे परिरक्षण . | कक्ष अधिकारी नोंदणीशाखा | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-२ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२८२३५०१ | सह /उप सचिव (आस्थापना) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |
| २५ | १)खुद्य विभागासाठी सर्व प्रकारची देयके तयार करणे,दैनंदिन व्यवहाराचे लेखे व्यवस्थित ठेवणे,<br>२) अर्थसंकल्प / सुधारित अर्थसंकल्प तयार करण्यासाठी विनियोजन लेखे तयार करण्यासाठी माहिती पुरविणे, अधिकारी व कर्मचारी यांच्या आयकराची परिगणना करणे, शासकीय पैसा जमा करणे व त्याचा भरणा करणे, अग्रीमे वसूल करणे व मुलत: देयकातच करावयाच्या वसुल्यासंबंधातील परिशिष्टे / दाखले तयार करणे, कर्मचारीवृंदांच्या वार्षिक वेतनवाढीच्या नोंदी सेवापुस्तकात घेणे, कर्मचा-यांची सेवापुस्तके अद्यावत ठेवणे,<br>३) खुद्द विभागाशी संबंधीत लेखा परीक्षा ज्ञापने व लेखा परीक्षा आक्षेप यांची उत्तरे देणे.<br>४)विभागातील अधिकारी व कर्मचारी हयांच्या वेतन भत्ते व मानधन यावर होणारा खर्च तसेच विभागामध्ये होणारा आकस्मिक खर्च हयांचा मेळ घालणे.<br>५)चतुर्थश्रेणी कर्मचा-याचे भविष्य निर्वाह निधी लेखे व्यवस्थित ठेवणे.<br>६)तृतीयश्रेणी कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधीच्या मुख्य सूची अद्यावत ठेवणे.<br>७)व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि रोजगार अधिनियम १९७५ खालील करांची वसूली. | कक्ष अधिकारी रोखशाखा | सार्वजनिक आरोग्य विभाग, पोटमाळा दालन क्र. एम-१३ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२७९३८५० | सह /उप सचिव (आस्थापना) | सार्वजनिक आरोग्य विभाग, १ ला मजला दालन क्र. १३५ (मुख्य) मंत्रालय, मुंबई ३२ दू.क्र-२२०२०४७६ |